# देवाने आपल्या लोकांची गुलामगिरीतून सुटका केली

हा अभ्यास करण्यापूर्वी उत्पत्ती मधील कुलाधिपती P2a1 हा अभ्यास वाचा.

मुलांना शिकविणाऱ्यांनी P2b1 व P2b2 हे अभ्यास वाचावेत.

## 1. निर्गमाविषयी शिकविण्यासाठी प्रार्थनापूर्वक देवाच्या वचनातून तयारी करा.

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभू, तुझ्या लोकांची फारो राजा व त्याचे सैन्य यांच्यापासून सुटका करण्यासाठी मोशेचा उपयोग केलास, त्याच्यासारखे धाडस, विश्वास व आज्ञाधारकपणा आम्हाला दे. तुझ्या राज्यात राष्ट्रे आणण्यासाठी, आरोग्य देऊन येशूच्या नावात जीवने बदलून टाकण्यासाठी तू आजही महान चमत्कार करतोस असा आमचा भरवंसा आहे.''

**पाहा** निर्गम अध्याय 1 मध्ये दुष्ट राजाने लहान मुलगे मारून टाकण्याचा प्रयत्न का केला? येशूच्या जन्मानंतर कोणत्या अशाच घटना घडल्या (मत्तय 2:13-16)?

पाहा निर्गम 2:1-10 मध्ये बाळ मोशेला कोणी वाचविले.

पाहा निर्गम 2:11-15 मध्ये नंतर मोशे मिद्यान देशात का पळून गेला आणि तिथे त्याच्या बाबतीत काय घडले.

पाहा निर्गम अध्याय 3 मध्ये जळत्या झुडुपातून बोलतांना देवाने मोशेला काय करायला सांगितले.



पाहा निर्गम अध्याय 5 मध्ये मोशे व फारो राजा आणि मोशे व त्याचे स्वतःचे लोक यांच्यामधील संघर्ष.



पाहा निर्गम अध्याय 6-11 मध्ये मिसराच्या राजाने देवाच्या लोकांची सुटका करावी म्हणून देवाने पाठविलेल्या दहा पिडा आणि शेवटची पिडा सर्वापेक्षा कशी अधिक भयानक होती.

पाहा निर्गम अध्याय 12 मध्ये देवाने कोणत्या सणाची स्थापना केली आणि देवाच्या लोकांनी आपल्या दाराच्या कपाळपट्यांना रक्त का लाविले.

पाहा मत्तय 16:17-28 मध्ये येशूने प्रभुभोजनाच्या विधीची स्थापना केली तेव्हा त्याने कोणता सण साजरा केला.

पाहा निर्गम अध्याय 14 मध्ये देवाच्या लोकांची मिसराच्या सैन्यापासून कशी सुटका झाली.

जुन्या करारातील सर्वात महान अद्भुत चमत्कार म्हणजे इस्राएल लोकांची मृत्यूच्या दाढेतून सुटका व्हावी यासाठी देवाने तांबड्या समुद्रांत त्यांच्याकरिता रस्ता तयार केला. इस्राएल लोकांची मिसराच्या दास्यातून सुटका ह्या महान घटनेवर देवाचा जुना करार आधारित आहे. ही घटना ख्रिस्ताच्या जन्मापूर्वी सुमारे 1500 वर्षे अगोदर घडली.



देवाच्या लोकांनी नाईल नदीचा त्रिभुज प्रदेश मागे मिसरामध्ये सोडला आणि तांबडा समुद्र पार करून ते सिनाय पर्वताच्या दिशेने वाटचाल करू लागले, येथेच देवाने मोशेला त्यांचे प्राचीन नियमशास्त्र दिले. काही परंपरा सीनाय पर्वताची जागा 1 या ठिकाणी आहे असे दाखवितात; परंतु, पुरातन वस्तू संशोधकांना टाकून दिलेली गाडगी मडकी आणि दागदागिने जागा 2 या ठिकाणी सापडली, त्यावरून येथे प्राचीन काळी पुष्कळ लोकांचा समूह राहात होता असे दिसते.

इस्राएल लोक मिसरामधून कोणत्या मार्गाने गेले ते पुढील नकाशात पाहा.



पाहा निर्गम अध्याय 16 मध्ये लोकांनी का कुरकुर केली आणि देवाने त्यांना कोणत्या दोन गोष्टी खायला दिल्या.

पाहा निर्गम अध्याय 17:1-13 मध्ये :

- लोकांनी पुन्हा कुरकूर का केली आणि देवाने त्यांना काय पुरविले.
- अहरोन व हूर ह्यांनी मोशेचे हात वर का उचलून धरले.

पाहा निर्गम अध्याय 18 मध्ये मोशेने लोकांची कशी व्यवस्था लावली.

**2. तुमच्या सहकाऱ्यांना आठवड्यामध्ये त्यांनी करावयाची कामे ठरवून द्या.**

- इथ्रोने सक्षम मेंढपाळांची नावे सुचविली, त्याच्या सल्ल्याप्रमाणे मंडळ्या व गट सुरू करा.
- नवीन मेंढपाळांना, निर्गमचा हा अभ्यास त्यांच्या मंडळीला शिकविता यावा यासाठी प्रशिक्षण द्या.
- ह्या पुढाऱ्यांना गरजू किंवा आजारी लोकांना जाऊन भेटण्यास तसेच त्यांना मार्गदर्शन करून प्रार्थना करण्यास सांगा.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा पुढील उपासनेसाठी योजना आखा.**

लोकांच्या गरजांनुसार कार्यक्रम निवडा.

तुम्ही भाग 1 मध्ये अभ्यासलेल्या काही घटना सांगा किंवा त्यांचे नाटयीकरण करा.

यहूदी लोकांनी आपल्या दाराच्या कपाळपट्ट्यांवर रक्त का लाविले याचे स्पष्टीकरण करा. वल्हांडणाचा सण प्रभुभोजनाशी कसा संबंधित आहे हे स्पष्ट करून सांगा.

स्पष्टीकरण करा. दुष्ट फारो राजा हे पवित्र शास्त्रातील सैतानाचे चित्र आहे.

- सैताना प्रमाणेच फारोकडेही मोठे अधिकार होते आणि त्याने लोकांना गुलामगिरीत ठेविले.
- देवाने इस्राएल लोकांची फारो व त्याच्या महाकाय सैन्यापासून सुटका केली; त्याप्रमाणे येशू लोकांची सैतान व त्याच्या दुष्ट आत्म्यांच्या सैन्यापासून सुटका करतो.
- ख्रिस्ताने पाप व भुतांपासून सुटका करण्याची आवश्यक असणाऱ्या लोकांसाठी प्रार्थना करा.
- मुलांनी तयारी केलेल्या गोष्टी सादर करण्यास संधी द्या.
- प्रभूभोजनाची ओळख करून देण्यासाठी निर्गम 12:3 वाचून स्पष्टीकरण करा.
- इस्राएल लोकांनी वल्हांडणाचा सण साजरा करण्यासाठी कोकरू खाल्ले.



- देवाचा दूत मिसर देशात फिरला आणि प्रत्येक घरातील ज्येष्ठ पुत्र मारला, परंतु दारावर कोकराचे रक्त लाविलेल्या घरांमधील पुत्र मात्र त्याने सोडले.
- येशू हा देवाचा कोकरा जगाचे पाप दूर करतो.
- येशू आला आणि मरण पावला, तेव्हा पासून प्रभुभोजन हा आमचा वल्हांडणाचा सण आहे.



विश्वासणाऱ्यांना साक्ष देण्याची संधी द्या, प्रभुभोजनामुळे त्यांना येशूचे यज्ञार्पणात्मक मरण आठवण्यास व प्रशंसा करण्यास कशी मदत झाली हे त्यांनी सांगावे.

दोन वा तीनजणांचे गट करा, त्यांनी एकमेकांसाठी प्रार्थना करावी आणि इतर लोकांची सैतानाच्या गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी त्यांना कशी मदत करता येईल याविषयी चर्चा करा.

निर्गम 15:18-19 ही वचने पुरुषांनी तर 20-21 ही वचने स्त्रियांनी पाठ करावीत.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net